**राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक अपंग खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः खेआक्ष १५१५/प्र.क्र.७१/क्रीयुसे २**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख : १ ऑक्टोबर, २०१५.

वाचा :

१) **शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः राक्रीधो २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे २, दिनांक ३० एप्रिल, २००५.**
२) **शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः खेआस २०१०/प्र.क्र.२७२/क्रीयुसे २, दिनांक ९ डिसेंबर, २०१०.**
३) **शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक:खेआस-२०११/प्र.क्र.६/११/क्रीयुसे-२, दिनांक २१ मे, २०११.**
४) **शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः खेआस-२०११/प्र.क्र.६/११/क्रीयुसे-२, दिनांक १० एप्रिल, २०१३.**

**प्रस्तावना :**

राज्याचे नाव उज्वल करणाऱ्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत शासनाने उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयांनुसार वेळोवेळी मान्यता दिली आहे. खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याकरिता अस्तित्वात असणाऱ्या प्रचलित तरतूदींमध्ये इंडीयन ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यता व संलग्नता प्राप्त असलेल्या राष्ट्रीय अपंग फेडरेशनव्दारे आयोजित अधिकृत स्पर्धा तसेच महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यता व संलग्नता प्राप्त असलेल्या महाराष्ट्र राज्य अपंग असोसिएशनव्दारे आयोजित अपंगांच्या क्रीडा स्पर्धांचा व क्रीडा प्रकारांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

इंडीयन ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यता व संलग्नता प्राप्त असलेल्या राष्ट्रीय अपंग फेडरेशनव्दारे आयोजित अधिकृत स्पर्धा तसेच महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यता व संलग्नता प्राप्त असलेल्या महाराष्ट्र राज्य अपंग असोसिएशनव्दारे आयोजित खालील अधिकृत स्पर्धांमधील प्राविण्य प्राप्त खेळाडूंचा शासन सेवेतील गट-अ, ब, क व ड मधील पदावर थेट नियुक्तीसाठी विचार करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| गट-अ मधील नियुक्तीसाठी | पॅरा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, जागतिक पॅरा क्रीडा स्पर्धा, एशियन पॅरा गेम्स् स्पर्धा, कॉमनवेल्थ पॅरा गेम्स स्पर्धांमधील पदक प्राप्त खेळाडू. |
| गट-ब मधील नियुक्तीसाठी | आशियाई पॅरा चॅम्पियनशिप स्पर्धा, ज्युनियर वर्ल्ड पॅरा चॅम्पियनशिप स्पर्धा, युथ पॅरा ऑलिम्पिक स्पर्धांमधील पदक प्राप्त खेळाडू. |
| गट-क मधील नियुक्तीसाठी | पॅरा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, जागतिक पॅरा क्रीडा स्पर्धा, एशियन पॅरा गेम्स् स्पर्धा, कॉमनवेल्थ पॅरा गेम्स् स्पर्धा, आशियाई पॅरा चॅम्पियनशिप स्पर्धा, ज्युनियर वर्ल्ड पॅरा चॅम्पियनशिप स्पर्धा, युथ पॅरा ऑलिम्पिक या अधिकृत स्पर्धांमध्ये पदक प्राप्त केलेला किंवा या स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व केलेला खेळाडू |
| गट-ड मधील नियुक्तीसाठी | साऊथ एशियन पॅरा चॅम्पियनशिप व कॉमनवेल्थ पॅरा चॅम्पियनशिप स्पर्धेमधील पदकप्राप्त खेळाडू किंवा उपरोक्त आंतरराष्ट्रीय स्पर्धांव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या (किमान ६ देश सहभागी असलेल्या) स्पर्धेमधील पदकप्राप्त खेळाडू किंवा गट-अ, ब व क मधील पदावर थेट नियुक्तीसाठी ग्राहय धरण्यात आलेल्या सर्व अधिकृत स्पर्धेमधील पदकप्राप्त खेळाडू. |

२. अपंग खेळाडूंनाही शासन सेवेत थेट नियुक्ती मिळण्याची संधी प्राप्त व्हावी, यादृष्टीने आयुक्तांनी प्रस्तावित केल्यानुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबतच्या प्रचलित तरतूदींमध्ये सुधारणा करुन दि.१०.०४.२०१३ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ व ब मध्ये थेट नियुक्ती देण्यासाठी ग्राहय धरावयाच्या क्रीडा प्रकारांच्या यादीमध्ये “पॅरा ऑलिम्पिक” व “ब्लाईंड स्पोर्टस्” या क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१००११११८२८८१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhir Narhar Joshi

Digitally signed by Sudhir Narhar Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ae398dc3198690b46b6cf9b227ff99cbbfa40f24b5beeb33a668bc465f937400, cn=Sudhir Narhar Joshi
Date: 2015.10.01 16:06:46 +05'30'

**( सु.न.जोशी )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव.

२. मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव.

३. मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव.

४. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे स्वीय सहाय्यक.

५. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

७. सर्व विभागीय उप संचालक, क्रीडा व युवक सेवा (संचालनालयामार्फत).

८. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत).

९. सर्व मंत्रालयीन विभाग.

१०.अवर सचिव, क्रीयुसे १/क्रीयुसे-३, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

११.निवडनस्ती, क्रीयुसे २